# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथातील देव, देऊळ आणि धर्म या विषयीचे परखड विचार दर्शन

प्रा. डॉ. सुजय बाबुराव पाटील,कमला कॉलेज, कोल्हापूर.मो. नं. ८४२१६६८४०६

**प्रस्तावना:**

भारत भूमी ही संताची भूमी म्हणून संबोधली जाते. भारताच्या विविध भू भागामध्ये उदयास आलेली विविध संत परंपरा व त्यांची भूमिका ही नेहमीच समाजाभिमुख राहिलेली आहे. सामाजिक प्रबोधन हा त्यांच्या उपदेशाचा, रचनांचा व साहित्याचा मध्यवर्ती बिंदू राहिलेला आहे. प्राचीन, मध्ययुगीन व आर्वाचीन संतपरंपरेने हा समाज प्रबोधनाचा धागा जाणीवपूर्वक जपलेला दिसतो.

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागविताना मानवाने मुल्यांचे जतन करावे. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे विवेकाने पाहावे. आपल्या बुध्दिमत्तेच्या जोरावर दैनंदिन जीवनातील प्रत्येक घटनेची चिकित्सा करावी ही संतांची शिकवण होती. यामुळेच संत एकनाथांनी आपल्या एकनाथी भागवताच्या चौथ्या अध्यायामध्ये लिहून ठेवलेले आहे. 'जो दैवांचे बंद सोडी। नवग्रहांची बेडी तोडी। जेणे रामराज्याची रोकडी। उभविली गुढी। तिही लोकी।।'

अशा प्रकारची चिकित्सा पुढे अर्वाचीन संतपरंपरेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीता व इतर रचनांच्यामधून केलेली दिसते.

**विषय विवेचन:**

अर्वाचीन संतपरंपरेमध्ये संत तुकाराम महाराज यांचा परखडपणा स्वीकारुन समाजाला आत्मभान देणारे जे संतमहात्मे होऊन गेले. त्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे अग्रभागी आहेत. राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता' हा ग्रंथ समाज विकासाची संहिता आहे. या ग्रामगीतेद्वारे समाज विकासाच्या अनेक वाटा आपल्यासमोर उभ्या केलेल्या आहेत. आज देव, धर्म आणि देऊळ या संदर्भात गोंधळलेली स्थिती आहे. त्या पार्श्वभूमीवर ग्रामगीता या ग्रंथातील विचार आशेचा किरण देव, देऊळ आणि धर्म यांची राष्ट्रसंतांनी केलेली चिकित्सा समाजाच्या डोळयात झणझणीत अंजन घालणारी अशी आहे.

मंदिरे ही समाज एकसंघ ठेवणारी केंद्रे असावीत. समाज भेदांच्या भिती निर्माण करुन समाज स्वास्थ्य बिघडवणारी उपद्रवी कारस्थानांचे अड्डे होऊ नयेत. मंदिरांच्या आडून स्त्री–पुरुष उच्चनीच असा बुध्दिभेद निर्माण करणाऱ्यांना मंदिरातून बाहेरचा रस्ता दाखवावा असा कठोर उपाय सुचविताना महाराज लिहितात.

'ऐसे हे मंदिर सजवावे। उपद्रवी लोक बाहेर करावे।।
सत्कीर्ती सद्‌बुध्दीने भरावे। देवस्थानासी।।'

देवळांची दुकानदारी होऊ नये. मंदिरातील पुजाअर्चा कमाईचे साधन ठरु नयेत. पुजाऱ्यांनी पोटासाठी दक्षिणापत्र पुढे करु नये. असे महाराजांचे सांगणे जे आज खूपच मार्गदर्शक वाटते. महाराज लिहितात–

'मंदिरे, क्षेत्रे, दुकाने झाली। पूजा कमाई करु लागली
दक्षिणा पात्रे पुढे आली। पोटासाठी।।'

लोक श्रध्दा भावनेने देवळांच्यामध्ये दानधर्म करतात. तिथे जमा होणारा पैसा हा जनतेचा असतो. त्याच्यावर पुजाऱ्याने डोळा ठेऊ नये. तो पैसा समाजाच्या विकासासाठी खर्च केला पाहिजे. त्यामधून शाळा बांधल्या गेल्या पाहिजेत. गाव सुधारणा केल्या पाहिजेत. यासाठी सर्व लोकांनी एकत्र याव असे महाराजांचे सांगणे आहे.

'मंदिरे म्हणजे पाठशाळा। चाले शिक्षणाचा सोहळा।
झाला निधी सर्व गोळा। याच कार्यी लावावा।
सर्व लोकांनी करावा निर्वाळा। मंदिराचा निधी सगळा।
समाज कार्या लावावा।।'

आज कोरानाच्या महामारीच्या संकटात शेगाव, अक्कलकोट, शिर्डी, तुळजापूर, कोल्हापूर, पंढरपूर, माहूर, वणी, श्री सिध्दी विनायक मंदिर, मुंबई इ. ठिकाणच्या महत्वाच्या देवस्थानांनी

आपल्या उत्पन्नातील खूप मोठा वाटा सरकारला दिलेला दिसतो. औषधांचा साठा, रुग्णालयाची उभारणी, अन्नछत्रे, निवारागृहे इ. सोय या देवस्थानांनी करुन जनतेकडून मिळालेला पैसा परत जनतेच्या सेवेसाठी दिलेला दिसतो. या कृतीमागे राष्ट्रसंतांच्या उपदेशाचा खूप मोठा आशय आहे असे आपणास दिसून येते.

काही वेळेला असे दिसून येते की, आपल्या देवाचे देऊळ मोठे असावे. त्यातून आपले वेगळेपण जपावे असा अविवेकीपणा भक्त आणि पुजारी लोकांकडून केला जातो. त्यामुळेच देऊळ मोठे बांधणे, भव्य आरास करणे, मोठे नंदादीप लावणे, सर्वात मोठे होमहवन घडवून आणणे असे अनेक निरर्थक उद्योग सुरु केले जातात. या अविवेकीपणाचा समाचार होताना महाराज लिहितात,

'देव मोठा नव्हे शृंगाराने। देव मोठा नव्हे भव्य देवळाने।
देव मोठा नव्हे घंटा वाजविल्याने। अहोरात्र।
देव मोठा नव्हे नंदादीपाने। देव मोठा नव्हे होमहवनाने।
देव मोठा नव्हे साळुंकीने। पर्वता एवढया।।'

देव हा लहान असत नाही की, मोठा असत नाही. तो जागृत अथवा झोपलेला नसतो. तो अनंत आहे. त्याचे फक्त स्मरण करावे व आपण आपल्या कार्यात तत्पर रहावे असा भक्त आणि देव यांच्या नात्यात सुवर्णमध्य अधोरेखित करताना तुकडोजी महाराज लिहितात—

देव एक असोनि अनंत झाला। नाना रुपे धरुनी नटाला।
परि तों पाहतां एकचि दिसला। कार्यरुपाने।।

धर्माविषयी महाराजांनी केलेले विवेचन त्यांच्या व्यापक पुरोगामी वृत्तीचे दर्शन घडविते. मानवता हाच खरा धर्म आहे. आपण सर्व एक आहोत ही भावना जेथे जोपासली जाते तोच खरा धर्म होय.

अशी 'धर्मा' विषयाची सोपी व्याख्या करताना तुकडोजी महाराज लिहितात.

'अनेक प्राणी जेथे राहती। त्या सर्वांची राहावी सुस्थिती।
समाज समाधानाची गती। त्यास धर्म म्हणावे।।'

**समोरापः**

थोडक्यात देव, देऊळ आणि धर्म यांनी माणसाचे माणूसपण टिकवावे. सर्वांचा आदरभाव करावा. आत्मसन्मान टिकवावा. भेदभावांना थारा देऊ नये असे झाले तरच समाज स्वास्थ टिकेल. असा मोलाचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि त्यांचे विचार आजच्या काळाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्वाचे वाटतात.

**निष्कर्षः**

१. भारतीय संतपरंपरा नेहमीच समाजाभिमुख राहिलेली आहे.
२. भारतीय संतपरंपरेने विवेकवादाचा पुरस्कार केलेला आहे.
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता हा ग्रंथ समाजची चिकित्सा करणारा विवेकवादी ग्रंथ आहे.
४. राष्ट्रसंताचे देव, देऊळ आणि धर्म या विषयीचे चिंतन आजच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्वाचे आहेत.
५. प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन संतपरंपरेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन अत्यंत महत्वाचा आहे.

**संदर्भः**

१. एकनाची भागवत.
२. संतसाहित्य काही निरीक्षणे, गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८९.
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता सुबोध निरुपण, डॉ. अशोक कामत प्रकाशक गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे, २००९.
४. ग्रामगीता, श्री. गुरुदेव प्रकाशन, अमरावती, पुणे २००९.